**नि.फौ.ख.क्र. ४४/२०२०**
सरकार – वि.- बबलु
**निशाणी क्र. २३**

**<u>सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. २ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अशोक लालासाहेब पायाळ ( जप्ती व अटक पंच)
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**(आरोपी बबलु अवधुत शर्मा हा दुस-या गुन्हयामध्ये येरवडा कारागृह, पुणे येथे बंदी असल्याने सदरील कारागृहातुन दृकश्राव्य पध्दतीने हजर.)**

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

दि. ०४/०९/२०१९ रोजी लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे गुन्हे शाखेचे पाटोळे साहेबांनी त्यांचे कार्यालयात पंचनाम्याकामी बोलवले होते. तेथे मी, दुसरा पंच बालाजी चक्रुपे व हरीओम जंगारे असे कार्यालयात हजर होतो. जंगारे यांचेकडे ओपो कंपनीचा सोनेरी रंगाचा मोबाईल होता तो त्यांनी साहेबांना दिला. चौकशीमध्ये त्यांनी सांगितले की, पिंपरी रेल्वे स्टेशन येथे बबलु शर्मा नावाच्या एका व्यक्तीकडुन सदरचा मोबाईल विकत घेतला आहे. पाटोळे साहेबांनी तो मोबाईल पुराव्याकामी आमचे समक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा केला. पंचनामा सकाळी १०.०० वाजता सुरू झाला व १०.४५ वाजता संपला. आता मला सदरचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच व पाटोळे साहेब यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २४** देण्यात येतो. जप्त मोबाईल दाखवल्यास मी ओळखु शकतो.

२. पोलीसांनी मला दि. ०१/१२/२०१९ रोजी पुन्हा त्यांचे कार्यालयात पंचनाम्याकामी बोलवले होते. मी गेल्यानंतर तेथे बबलु शर्मा नावाचा व्यक्ती हजर होता. पोलीसांनी माझे समक्ष त्याची अंगझडती घेतली व त्यास अटक केली. त्याचे आईस अटकेचे कारण सांगण्यात आले. पोलीसांनी त्यानंतर पंचनामा तयार केला व माझ्या सहया घेतल्या. पंचनामा दुपारी ०२.०० ला सुरू होवुन ०२.३० वाजता संपला. आता मला सदरचा अटक पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच, पाटोळे साहेब व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर

**नि.फौ.ख.क्र. ४४/२०२०**
सरकार – वि.- बबलु
**निशाणी क्र. २३**

असुन त्यास **नि.क्र. २५** देण्यात येतो. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.टी.नावडकर यांच्यामार्फत सुरू-**

३. मोबाईल आरोपी बबलु कडुन जप्त केलेला नव्हता. या अगोदर मी ब-याच प्रकरणात पंच म्हणुन न्यायालयात साक्ष दिली आहे तसेच पोलीस स्टेशनला देखील हजर राहिलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी पोलीस स्टेशनला जावुन फक्त सहया करुन परत आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, जंगारे यांनी आरोपी बबलु यांचेकडुन मोबाईल खरेदी केला असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या सांगण्यावरुन मी जप्ती पंचनाम्यावर सहया केल्या.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.12 17:21:58 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि.१२/०१/२०२६